# समिती दर्पण

**सप्टेंबर २०२४**

विद्यार्थी साहाय्यक समिती : दूरध्वनी : ०२०-२५५३३६३१, मोबाईल : ९४०४८५५५३०
ईमेल : info@samiti.org, वेबसाईट : www.samiti.org


## समितीविषयी...

ग्रामीण भागातील हजारो विद्यार्थ्यांच्या जीवनात परिवर्तन घडविणारी संस्था आणि युवा परिवर्तनाचे केंद्र म्हणून विद्यार्थी साहाय्यक समितीच्या कामाकडे पहावे लागेल. गुणवत्ता आहे, परंतु पैशांअभावी शहरात येऊन उच्च शिक्षण घेता येत नाही, अशा विद्यार्थ्यांसाठी पुण्यात अतिशय माफक दरात राहण्याची आणि जेवणाची सोय उपलब्ध करून द्यावी, या हेतूने डॉ. अच्युतराव आपटे, स्वातंत्र्य सेनानी हरिभाऊ फाटक, सुमित्राताई केरकर आदींनी सन १९५५ मध्ये समितीची स्थापना केली. पाच विद्यार्थ्यांची वेगवेगळ्या घरी वाराने जेवणाची सोय करण्यापासून कामाला सुरुवात झाली. आज समितीची पुण्यात सात आणि नगरमध्ये एक अशी आठ वसतिगृहे आहेत. त्यात सुमारे ११०० विद्यार्थी -विद्यार्थिनींची निवास-भोजनाची व्यवस्था तर आहेच, शिवाय त्यांच्या व्यक्तिमत्व विकासासाठी उपक्रम राबविले जात आहेत. स्वच्छता, समता आणि श्रमप्रतिष्ठा या त्रिसूत्रीवर समितीचे काम चालते.

# स्वप्नपूर्तीचा तिहेरी आनंद आणि प्रवेशप्रक्रियेचे आव्हान

विद्यार्थी साहाय्यक समितीसाठी यंदाचे वर्ष हे विशेष आनंदाचे आणि अभिमानाचे आहे. याची तीन कारणे... एक म्हणजे यंदाच्या शैक्षणिक वर्षापासून समितीची मुलींसाठीची दोन वसतिगृहे सुरू झाली, एक नगरला आणि दुसरे पुण्यात, दुसरे म्हणजे नगरच्या वसतिगृहाच्या निमित्ताने समितीने प्रथमच पुण्याबाहेर आपले कार्यक्षेत्र वाढविले आणि तिसरे म्हणजे समितीच्या वसतिगृहांमध्ये किमान एक हजार मुलामुलींची व्यवस्था व्हावी, हे संस्थापकांचे स्वप्न प्रत्यक्षात आले. ही संख्या यंदा एक हजाराहून अधिक झाली आहे.

ग्रामीण भागातील मुलींच्या शिक्षणाचे प्रमाण वाढले आहे. बारावीनंतर शहरात येऊन उच्च शिक्षण घेण्याचीही त्यांची धडपड असते, पण प्रश्न असतो पैशांचा आणि सुरक्षिततेचा. त्यामुळे समितीच्या वसतिगृहात प्रवेश मिळाला, तरच उच्च शिक्षणासाठी शहरात पाठविण्याची पालकांचीही मानसिकता असते. पुण्यात मुलींसाठीची आपटे वसतिगृह आणि सुमित्रा सदन अशी दोन वसतिगृहे आहे, ज्यांची एकूण क्षमता ३२० आहे. जागेअभावी गेल्या वर्षीपर्यंत समितीकडे अर्ज करणाऱ्या पाच मुलींपैकी एकीलाच प्रवेश देणे शक्य होते. त्यामुळे पुण्यात मुलींसाठी नवीन वसतिगृह उभारण्याचा निर्णय झाला आणि शिवाजी हाऊसिंग सोसायटीतील लजपत भवन वसतिगृहाच्या आवारातील जागेत नवीन वसतिगृह उभारण्यात आले.

सुमारे १ लाख चौरस फूट बांधकाम असलेल्या या वसतिगृहाची उभारणी अवघ्या दीड ते पावणेदोन वर्षात पूर्ण झाली आहे. इंग्रजी H आकाराची ही इमारत दोन विंगमध्ये विभागलेली आहे. या वसतिगृहात ११२ खोल्या असून प्रत्येकी तीन याप्रमाणे ३३६ मुलींची राहण्याची व्यवस्था होणार आहे.

### कार्यकर्त्यांच्या परिश्रमामुळे पेलले आव्हान

समितीच्या वसतिगृहांमध्ये पहिल्या वर्षाच्या विद्यार्थ्यांसाठी दरवर्षी प्रवेश प्रक्रिया राबविली जाते. दरवर्षी साधारण २५० नवीन मुलामुलींना प्रवेश दिली जातो. यंदा त्यात ३३६ मुलींच्या प्रवेशाची भर पडली. यासाठी एकूण ९४४ मुलींनी ऑनलाइन अर्ज केले होते. त्यापैकी पात्र ६९० मुलींना मुलाखतीसाठी बोलावले होते. ४४७




मुलींची निवड केली. एवढी मोठी प्रक्रिया राबविणे, हे मोठे आव्हान होते. समितीच्या कार्यकर्त्यांनी त्यासाठी परिश्रम घेतले. १ मे ते २७ सप्टेंबर असे सुमारे ४ महिने ही प्रक्रिया सुरू होती. ३१ मे ते २७ सप्टेंबर दरम्यान २१ दिवस मुलाखती घेण्यात आल्या. रोज सरासरी ८ कार्यकर्त्यांनी यासाठी वेळ दिला. प्रत्येक मुलीच्या मुलाखतीची सरासरी वेळ ५५.६५ मिनिटे इतकी होती. ६९० मुलींच्या मुलाखती झाल्या. याचा अर्थ कार्यकर्त्यांनी एकूण ६४० तास मुलींच्या प्रवेशाच्या मुलाखतींसाठी दिले. कार्यकर्त्यांनी यासाठी मनापासून दिलेला वेळ आणि श्रम यामुळेच हे आव्हान पेलणे शक्य झाले.

### पूर्णत्व प्रमाणपत्राअभावी कसरत

यंदाच्या शैक्षणिक वर्षासाठी नवीन वसतिगृहात मुलींना





प्रवेश देणे निश्चित झाले, प्रवेश प्रक्रिया सुरू केली. परंतु २० जुलैपर्यंत इमारतीला पूर्णत्व प्रमाणपत्र (completion certificate) मिळाले नव्हते. त्यामुळे आपटे वसतिगृह व सुमित्रा सदनमध्ये अधिक मुलींना तात्पुरते प्रवेश दिले गेले आणि प्रमाणपत्र मिळाल्यानंतर त्या मुलींना नवीन वसतिगृहात हलविण्यात आले.

### काही नियम शिथिल

यावर्षी प्रवेश दिल्या जाणाऱ्या मुलींची संख्या मोठी होती, त्यामुळे प्रवेशासाठीचे काही नियम शिथिल केले. अकरावी-बारावी तसेच पदव्युत्तर अभ्यासक्रमाच्या मुलींना प्रवेश देण्यात आला. सख्ख्या भावंडाना समितीत प्रवेश दिला जात नाही. याला अपवाद करून काही प्रवेश दिले गेले.

### विश्वस्त रत्नाकर मते यांचा सन्मान

वसतिगृहाचे बांधकाम कमी वेळेत आणि चांगले होण्याचे संपूर्ण श्रेय आहे समितीचे विश्वस्त रत्नाकर मते आणि प्रकल्प गट टीमला. श्री. मते यांचे नियोजन आणि पाठपुरावा यामुळेच हे काम नियोजित वेळेत पूर्ण होऊन यंदा मुलींना प्रवेश देणे शक्य झाले. त्यांनी हे शिवधनुष्य पेलले. त्यांच्या या परिश्रमाची पावती म्हणून २८ सप्टेंबर रोजी कार्यकर्ता मंडळाच्या बैठकीत त्यांचा सन्मान करण्यात आला. हा सन्मान त्यांच्या पत्नी सौ. सुनीता यांच्या हस्ते करण्यात आला, कारण पत्नी आणि कुटुंबीयांचे सहकार्य आणि पाठिंब्यामुळेच श्री. मते यांना इतके झोकून देऊन काम करता आले. आणखी एक विशेष म्हणजे त्यांनी या वसतिगृहासाठी आपला वेळ, ज्ञान आणि श्रमच दिले असे नाही, तर वसतिगृहाच्या एका खोलीसाठी १० लाख रुपयांची देणगीही दिली. यावेळी त्यांचा मुलगा हृषिकेश व सून ऋचा यांनी मनोगत व्यक्त केले.



मी समितीचा लाभार्थी आहे. त्यामुळे माझी जबाबदारीच आहे. लाभार्थी नसलेले लोक समितीसाठी वेळ देत आहेत. उद्योजकता विकास, विद्यार्थी विकास केंद्र, एफसीआरए, सीएसआर या प्रत्येक उपक्रमातील कार्यकर्ते आपापले काम चोख करत आहेत. मीही मला दिलेली जबाबदारी पार पाडली. समितीचे अध्यक्ष, कार्यकारी विश्वस्त सगळ्यांची हीच धारणा असल्याने कामाला गती मिळाली. त्यामुळे हा सन्मान माझा एकट्याचा नाही, तर टीमचा आहे.

- **रत्नाकर मते,** विश्वस्त

# प्रश्नोत्तरांतून झाली समितीची ओळख

## डॉ. आपटे वसतिगृह, सुमित्रा सदन, लजपत संकुलात परिचय सभा

डॉ. आपटे वसतिगृह, लजपत संकुल तसेच सुमित्रा सदन वसतिगृहात नवीन दाखल झालेल्या विद्यार्थी- विद्यार्थिनींसाठी परिचय सभा झाल्या. या सभांचे स्वरुप यावेळी बदलले. समितीविषयी माहितीपट दाखविल्यानंतर कार्यकर्त्यांनी मुलामुलींना समितीविषयी प्रश्न विचारले आणि त्यांच्या उत्तरातूनच समितीची माहिती, नियम उलगडत गेले.

सभेत विद्यार्थी- विद्यार्थिनींनीही आपली मते, प्रश्न मांडले. कार्यकर्त्यांनी त्याचे निरसन केले. समितीच्या विविध योजनांची माहिती देण्यात आली. तिन्ही वसतिगृहांतील सभांमध्ये कार्यकारी विश्वस्त तुषार रंजनकर यांनी प्रास्ताविक केले. डॉ. आपटे वसतिगृहात ३१ ऑगस्टला परिचय सभा झाली. यावेळी कार्यकर्त्या सुप्रिया केळवकर यांनी कार्यकर्त्यांचा परिचय करून दिला. सिद्धी राऊत हिने मनोगत व्यक्त केले. अनुष्का राऊत हिने आभार मानले.

सुमित्रा सदनमध्ये ४ सप्टेंबरला परिचय सभा झाली. सूत्रसंचालन गायत्री शेळके हिने केले. आभार स्वामिनी कुलकर्णी हिने मानले. लजपत संकुलातील नवप्रवेशित विद्यार्थ्यांसाठी ११ सप्टेंबरला परिचय सभा झाली. विद्यार्थी विकास केंद्राचे अध्यक्ष प्रभाकर पाटील यांनी उपस्थितांचा परिचय करून दिला. विद्यार्थ्यांनी मान्यवरांशी संवाद साधला.



**पुण्यातील मुलींच्या नवीन वसतिगृहात कमवा- शिका योजनेंतर्गत आकाश कंदील तयार करताना मुली.**

# पुण्यातील नव्या वसतिगृहाचा पहिला दिवस

नवीन वसतिगृहाच्या कामकाजास अतिशय छान प्रारंभ झालेला आहे. पहिल्या दिवशी समितीचे विश्वस्त रत्नाकर मते, वसतिगृह उपसमितीचे कार्यवाह हरिश अष्टेकर, विद्यार्थी विकास केंद्राचे अध्यक्ष प्रभाकर पाटील यांनी शुभेच्छा दिल्या. समन्वयक कुंदन पठारे यांनी नियोजनात मदत केली. सर्व वसतिगृहांच्या पर्यवेक्षकांनी सहकार्य केले. मुख्य कार्यपालन अधिकारी दुर्गेश पवार यांनी वेळोवेळी माहिती घेऊन सूचना केल्या.

वसतिगृहातील आनंदमय, खेळीमेळीचे वातावरण पाहून नवीन वसतिगृहात मुलींना सोडायला आलेले त्यांचे पालक आनंदी आणि समाधानी चेहऱ्याने घरी परतले. सायंकाळी वसतिगृह उपसमितीचे अध्यक्ष दिनकर वैद्य यांनी वसतिगृहात येऊन मुलींशी संवाद साधला. व्यवस्थापनातील सर्व मुलींनी वसतिगृहात नवीन आलेल्या मुलींना अतिशय चांगल्या प्रकारे सहकार्य केले.

पर्यवेक्षिका मोनिका शिंदे यांनी पसायदान घेतले. यावेळी नवीन मुलींचे स्वागत करून त्यांना विद्यार्थी साहाय्यक समितीची माहिती देण्यात आली. समितीच्या सर्व नियमांचे पालन कसे करावे, याबाबत मागदर्शन करण्यात आले.

**मनोगत**

# जुळले समितीशी नाते

समितीच्या नगरमधील पहिल्या वसतिगृहाची मी पहिली विद्यार्थिनी. मी मूळची नगर जिल्ह्यातील नेवासा तालुक्यातील म्हाळस पिंपळगावची. बारावीनंतर मी नगरमध्ये न्यू आर्टस्, कॉमर्स अँड सायन्स कॉलेजमध्ये प्रथम वर्षासाठी प्रवेश घेतला. कॉलेजच्या ग्रंथालयात मी समितीचे नाव वाचले. ४ ऑगस्टला समितीच्या वसतिगृहात प्रवेश घेतला. तिथे पहिल्यांदा पर्यवेक्षिका विद्या सूर्यवंशी ताई भेटल्या. मी प्रथम त्यांना मॅडम म्हणत होते. त्यांनी मला 'ताई' म्हणायला सांगितले. 'ताई' या शब्दामुळे आपोआपच त्यांच्याशी जवळीक, आपुलकी निर्माण झाली. समिती आल्यावर त्यांनी व सुनीता झिंजाडताईंनी माझे स्वागत केले. पहिल्या दिवशी मला करमेना. त्यामुळे मी रडले. झिंजाडताईंनी त्यांच्या दिदीला माझ्यासोबत पाठवले. पण नंतर १५ दिवसांतच मी वसतिगृहात रमले. प्रत्येक विद्यार्थिनी स्वयंपूर्ण होण्यासाठी येथे विविध उपक्रम राबविले जातात. त्यामुळे काही दिवसांतच माझाही आत्मविश्वास वाढला. पहिल्या दिवशी मी रडले, हे आठवले तरी हसू येते, इतके आता समितीबरोबर नाते जोडले गेले आहे.

**कार्तिकी कानिफनाथ आहेर,** कै. मधुभाऊ चौधरी वसतिगृह, नगर.

# नगरच्या कार्यकर्त्यांचे प्रयत्न

नगरच्या कै. मधुभाऊ चौधरी मुलींच्या वसतिगृहाचे उद्‌घाटन ७ जुलै २०२४ रोजी झाले. ६० क्षमता असलेल्या या वसतिगृहातही यंदा मुलींना प्रवेश देण्यात आला. या प्रवेशासाठी नगरमधील कार्यकर्त्यांनी परिश्रम केले. नगरमध्ये समितीचे हे पहिलेच वसतिगृह असल्याने समितीची ओळख तेथे रुजविण्यापासून प्रयत्न करावे लागले. कार्यकर्त्यांनी जवळच्या महाविद्यालयांमध्ये जाऊन समितीची संकल्पना समजावून दिली. वसतिगृहातील सोयी- सुविधा, मुलींच्या व्यक्तिमत्त्व विकासासाठी समितीतर्फे राबविले जाणारे उपक्रम आणि मुख्य म्हणजे सुरक्षितेसंदर्भात घेतली जाणारी काळजी याविषयी सांगितले. आतापर्यंत १० मुलींना प्रवेश दिला असून येत्या १५ डिसेंबरपूर्वी सर्व प्रवेश पूर्ण करण्याचा प्रयत्न आहे.

## तुकाराम गायकवाड कायम विश्वस्त; तर प्रकाश आपटे स्वीकृत सदस्य




विद्यार्थी साहाय्यक समितीचे कायम विश्वस्त म्हणून तुकाराम गायकवाड यांची तर स्वीकृत सदस्यपदी प्रकाश आपटे यांची निवड झाली आहे. श्री. तुकाराम गायकवाड समितीचे माजी विद्यार्थी आहेत. तीसहून अधिक वर्षे ते समितीच्या कामात सक्रिय असून गायकवाड एंटरप्रायझेसचे संस्थापक आहेत. श्री. आपटे हे सिंजेंटा कंपनीचे माजी अध्यक्ष, कोटक बँकेचे अध्यक्ष, इंडो-स्विस स्किल डेव्हलपमेंट सेंटरचे प्रमुख, तसेच अनेक कंपन्यांच्या कार्यकारी मंडळात कार्यरत आहेत. रमाकांत तांबोळी सरांच्या माध्यमातून ते समितीशी जोडले गेले असून गेल्या अनेक वर्षांपासून समितीचे देणगीदार आहेत. समितीत सध्या ते इंडस्ट्री कौन्सिलमध्ये कार्यरत आहेत. त्यांच्या माध्यमातून गेल्या वर्षी फाईन ऑरगॅनिक कंपनीकडून मुलींच्या वसतिगृहातील ५ खोल्यांसाठी ५० लाख रुपयांची देणगी मिळाली. कॉर्पोरेट व स्किल डेव्हलपमेंटमधील त्यांचा अनुभव मोठा आहे.

### फाउंडेशन कोर्स



## संवाद कौशल्याविषयी गायकवाड यांचे मार्गदर्शन

डॉ. आपटे वसतिगृहामध्ये १९ सप्टेंबरला 'संवाद कौशल्ये' या विषयावर फाउंडेशन कोर्सचे सत्र पार पडले. यात समितीचे माजी विद्यार्थी, माजी कार्यकारी विश्वस्त तुकाराम गायकवाड यांनी मार्गदर्शन केले. संवाद कौशल्ये वाढवण्यासाठी समितीमधील विद्यार्थी विकास केंद्राचे कार्यक्रम हा उत्तम पर्याय आहे. जीवनात शिक्षणापेक्षा कौशल्ये अधिक उपयोगी ठरतात. त्यामुळे कौशल्ये आत्मसात करण्याचा प्रयत्न केला पाहिजे, असे श्री. गायकवाड यांनी सांगितले. समितीतील माजी विद्यार्थ्यांचा जीवन प्रवास आणि करिअरमधील उत्कृष्ट यश यांचे उदाहरण देत त्यांची प्रेरणा घेण्याचा सल्ला विद्यार्थिनींना दिला.

## 'बदलाचा स्वीकार हेच अनेक समस्यांचे उत्तर'

डॉ. आपटे वसतिगृहामध्ये २४ सप्टेंबरला ' Problem Solving and Decision Making' या विषयावर फाउंडेशन कोर्सचे सत्र पार पडले. समितीचे माजी विद्यार्थी डॉ. हरिष पाटणकर यांनी मार्गदर्शन केले. समस्या सोडवणे आणि प्रभावी निर्णय देणे, ही आजच्या वेगवान आणि बदलत्या कामाच्या ठिकाणी आवश्यक कौशल्ये आहेत. प्रत्येक समस्येसाठी 'इसका मुझे स्वीकार है।' हे उत्तर आहे, असे पाटणकर यांनी सांगितले. बदल स्वीकारला पाहिजे, आयुष्यात जर लक्ष्य साध्य करायचे असेल तर अन्य गोष्टींकडे दुर्लक्ष करता आले पाहिजे, Think only creative, constructive and positive, असा सल्ला त्यांनी दिला.

## प्रणय पाले यांनी दिला सल्ला

'Problem Solving and Decision Making' याच विषयावर २६ सप्टेंबरला लजपत संकुलात समितीचे माजी विद्यार्थी प्रणय पाले यांनी मार्गदर्शन केले. लजपत संकुलातील विद्यार्थ्यांसह नवीन वसतिगृहातील विद्यार्थिनी यावेळी उपस्थित होत्या. एखादी गोष्ट सोपी करायची असेल तर त्यातील अनावश्यक बाबी वगळल्या पाहिजे, असे सांगत कल्पकतेने समस्या सोडविण्यावर भर देण्याचा सल्ला दिला. समितीत राहण्याचे फायदे आणि मिळणाऱ्या संधींबद्दलही त्यांनी सांगितले.

## 'आंत्रप्रेन्युअरशिप'विषयी संवाद

फाउंडेशन कोर्सअंतर्गत २६ सप्टेंबर रोजी विश्वस्त डॉ. ज्योती गोगटे यांनी आंत्रप्रेन्युअरशिप या विषयावर ऑनलाइन पद्धतीने संवाद साधला. स्लाइड शोच्या माध्यमातून त्यांनी विषयाचे सादरीकरण केले. नेतृत्व आणि टीमवर्क, व्यवस्थापन व त्यातील आव्हाने, संवाद कौशल्य आदी विषयांवर मार्गदर्शन केले.




# माजी विद्यार्थिनींनी अनुभवले 'माहेरपण'

वसतिगृहातील आठवणींना उजाळा देत सुखी संसाराच्या, करिअरच्या आणि मुलाबाळांच्या गप्पागोष्टी करत समितीच्या माजी विद्यार्थिनींनी पुन्हा एकदा माहेरपण अनुभवले. प्रेमाने, आपुलकीने भारावलेल्या या माहेरवाशिणींच्या चेहऱ्यावर आनंदाचा गोडवा पाहायला मिळाला.

निमित्त होते, विद्यार्थी साहाय्यक समितीच्या माजी विद्यार्थी मंडळाच्या वतीने आयोजित केलेल्या माजी विद्यार्थिनींच्या मेळाव्याचे. 'मिळुनी साऱ्या जणी, पुन्हा समितीच्या अंगणी' म्हणत वेगवेगळ्या बॅचमधील सुमारे शंभर माजी विद्यार्थिनींनी रविवारी (२९ सप्टेंबर) डॉ. आपटे वसतिगृहात झालेल्या स्नेहमेळाव्यात सहभागी होत समितीतील दिवसांचा पुन्हा आनंद घेतला. गाणी, सामूहिक खेळ, गप्पाटप्पा, सांस्कृतिक कार्यक्रमाचे सादरीकरण झाले.

समितीचे कार्यकारी विश्वस्त तुषार रंजनकर, माजी विद्यार्थी मंडळाचे अध्यक्ष गणेश काळे, उपाध्यक्ष अनिल खेतमाळीस, सचिव मनीषा गोसावी, विद्यार्थी विकास केंद्राचे अध्यक्ष प्रभाकर पाटील, माजी विद्यार्थिनी व पुणे नगरपालिकेच्या सहायक आयुक्त सुरेखा भणगे यांच्यासह समितीचे व मंडळाचे पदाधिकारी, विविध क्षेत्रांत उच्च पदावर कार्यरत माजी विद्यार्थिनी मोठ्या संख्येने उपस्थित होत्या.

तुषार रंजनकर यांनी समितीच्या विस्ताराविषयी माहिती देत विद्यार्थ्यांमागील तूट भरून काढण्यात माजी विद्यार्थ्यांनी योगदान देण्याचे आवाहन केले. पाल्य- पालक योजनेत माजी विद्यार्थ्यांनी सहभाग वाढवून आजी विद्यार्थ्यांना प्रोत्साहित करायला हवे, असे सांगितले.

गणेश काळे म्हणाले, "माजी विद्यार्थ्यांचे सभासदत्व वाढविण्यासाठी सर्वांचे लाडके पर्यवेक्षक रमाकांत तांबोळी यांच्या स्मरणार्थ माजी विद्यार्थी मंडळ पुढील तीन वर्षांत पाच कोटी रुपयांचा निधी उभारून मातृसंस्था समितीला देणगीरूपात देणार आहे. यामध्ये प्रत्येक माजी विद्यार्थ्याने योगदान द्यावे."

विशेष प्राविण्य, पुरस्कार मिळवलेल्या व उल्लेखनीय कामगिरी केलेल्या माजी विद्यार्थिनींचा, तसेच निबंध स्पर्धेतील विजेत्यांचा यावेळी सन्मान करण्यात आला. अनिता देशपांडे व ॲड. प्रार्थना सदावर्ते यांनी सूत्रसंचालन केले. सुनीता पाटील यांनी आभार मानले.

# अभियंता दिनी 'प्रौद्योगिक : शाश्वतता' कार्यक्रम

विद्यार्थी साहाय्यक समिती अभियंता दिनाचे औचित्य साधून 'प्रौद्योगिक : शाश्वतता' या विशेष कार्यक्रमाचे आयोजन केले होते. शाश्वततेचे प्रतीक असलेल्या 'प्रौद्योगिक' संकल्पनेंतर्गत अभियांत्रिकी क्षेत्रातील नावीन्य, सहयोग आणि उत्कृष्ट योगदान यांची माहिती करून घेणे, हा कार्यक्रमाचा उद्देश होता. १४ व १५ सप्टेंबर या दोन दिवसांत हॅकेथॉन स्पर्धा, इनोव्हेशन फेअर, उद्योजकता स्पर्धा, मजेदार शैक्षणिक खेळ, पोस्टर स्पर्धा, 'आलसी इंजिनिअर'वर चर्चासत्र आणि अनुभवकथन असे विविध उपक्रम राबविण्यात आले.

भारत फोर्जचे वरिष्ठ व्यवस्थापक शैलेंद्र चव्हाण प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. रोश डिजिटल सेंटर ऑफ एक्सलन्सचे टेक लीड अविनाश कुमार तिवारी, पुणे विद्यार्थी गृहाच्या अभियांत्रिकी आणि तंत्रज्ञान महाविद्यालयातील यांत्रिक अभियांत्रिकी विभागाचे प्रमुख मनमोहन भूमकर, फाउंडेशन फॉर मेकइटहॅपन सेंटर फॉर इनोव्हेशन, इन्क्युबेशन अँड इन्क्युबेशनचे (एफएमसीआयआयआय) मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. चंद्रशेखर तळाठी, हेलिक्स इंटिग्रेटेड लर्निंगचे संस्थापक नाथाजी शेळके, अभियंता विवेक सलवारू, मायक्रोपॉइंट कॉम्प्युटर्सचे राहुल चौधरी आणि दीपक नारखेडे यांच्यासह एआय, क्लाउड कम्प्युटिंग आणि इंटरनेट ऑफ थिंग्ज क्षेत्रातील तज्ज्ञ यावेळी उपस्थित होते.

### अभियंता दिनानिमित्त स्पर्धांतील विजेते-

- **मॉक प्लेसमेंट**- राजकन्या पाटील (प्रथम), वैष्णवी लष्करे (द्वितीय), प्रथमेश काटे (तृतीय).
- **हॅकेथॉन**- वैभव काळे (प्रथम), ज्ञानेश्वरी थोरवे (द्वितीय), तन्वी घोलप (तृतीय).
- **इनोव्हेशन फेअर आणि उद्योजकता**- प्रसाद काकडे (प्रथम), तन्मय बामदाळे (द्वितीय), पल्लवी शिंदे (तृतीय).



- **पोस्टर प्रेझेंटेशन**- वैष्णवी बिरादार (प्रथम), शिवानी देशमुख (द्वितीय), वैष्णवी हर्ले (तृतीय).

समितीचे कार्यकारी विश्वस्त तुषार रंजनकर यांच्या मार्गदर्शनाखाली हा कार्यक्रम झाला. विश्वस्त रत्नाकर मते, विद्यार्थी विकास केंद्राचे अध्यक्ष प्रभाकर पाटील, इंजिनिअरिंग क्लबचे प्रमुख माजी विद्यार्थी सुनील चोरे, माजी विद्यार्थी प्रा. सचिन जायभाये, गणेश चव्हाण, अभियांत्रिकी क्लब समन्वयक आकाश दुबे, क्लब प्रमुख शाश्वती कुलकर्णी, अंशु कुमारी, रोहित गोरे यांनी कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी परिश्रम घेतले

# पर्यावरणपूरक गणेशोत्सव, विनावर्गणी आरास




डॉ. आपटे वसतिगृहातील 'ऑलिंपिक - २०२४' देखावा

विद्यार्थी साहाय्यक समिती व विद्यार्थी विकास केंद्राच्या वतीने यंदा गणेशोत्सवात पर्यावरणपूरक विनावर्गणी गणपती आरास उपक्रम राबविण्यात आला. समितीच्या डॉ. आपटे वसतिगृह, सुमित्रा सदन, लजपत संकुलात दरवर्षीप्रमाणे अडीच दिवसांचा उत्सव झाला. मुलींच्या नवीन वसतिगृहातही उत्सव साजरा करण्यात आला. दरवर्षीच हा उत्सव पर्यावरणपूरक असतो. ज्यात प्लास्टिकचा वापर पूर्णपणे टाळला जातो. नैसर्गिक घटकांचा, जसे की फुले, पाने आणि कागदाचा वापर करून आकर्षक आरास तयार केली जाते. विनावर्गणी गणपती संकल्पनेत, परिसरात उपलब्ध असलेल्या साध्या वस्तूंचा वापर करून गणपतीची प्रतिमा तयार केली जाते. यामुळे खर्च कमी होतो, सृजनशीलतेला वाव मिळतो. सजावटीचे परीक्षण समितीच्या कार्यकर्त्या हेमा बापट आणि शुभांगी चिरपुटकर यांनी केले. विजेते पुढीलप्रमाणे– प्रथम- डॉ. आपटे वसतिगृह, द्वितीय- लजपत संकुल.

### ज्ञानसत्रात मार्गदर्शन

गणेशोत्सवानिमित्त आयोजित ज्ञानसत्रात पहिल्या दिवशी ८ सप्टेंबरला लजपत संकुल येथे डॉ. मृणाल नेर्लेकर यांनी समर्थ रामदासांच्या श्लोकांवर आधारित मार्गदर्शन केले. त्यांनी दासबोधातील श्लोक, शिष्याची गुणवैशिष्ट्ये, श्रद्धा, परिश्रमाचे महत्त्व यावर विचार मांडले. सूत्रसंचालन प्रज्ञा काव्हळे हिने केले. आभार जीवन बोधले याने मानले.

९ सप्टेंबरला दुसऱ्या ज्ञानसत्रात श्री. मिलिंद देशमुख यांनी नियमित व्यायाम, आरोग्य, शारीरिक व मानसिक स्वास्थ्य, वाचन, आणि मोबाईलपासून दूर राहण्याचे महत्व सांगितले. त्यांनी विद्यार्थ्यांमधील अंधश्रद्धा दूर करण्यासाठी प्रयोग देखील केले. श्रीमती नंदिनी जाधव यांनी अंधश्रद्धेमुळे होणाऱ्या फसवणुकीबद्दल सांगितले. सूत्रसंचालन सायली माने, पाहुण्यांचा परिचय सार्थता देशपांडे आणि आभार प्रदर्शन सुशील पुरी यांनी केले.

१० सप्टेंबरला डॉ. आपटे वसतिगृहात आर्टिफिशियल इंटेलिजन्स या विषयावर ज्ञानसत्र झाले. प्रमुख पाहुणे विवेक सावंत यांनी एआय आणि मानवी बुद्धिमत्ता या विषयी सादरीकरण केले. एआय माणसाच्या विविध अंगीभूत गुणांची नक्कल करू शकत नाही, असे त्यांनी सांगितले. अनुष्का राउत हिने आभार मानले.

### 'ऑलिंपिक' देखाव्याला पसंती

गणेशोत्सवानिमित्त डॉ. आपटे वसतिगृहामध्ये 'ऑलिंपिक २०२४' हा देखावा तयार करण्यात आला होता. आपटे वसतिगृहातील विद्यार्थिनी सानिका दांगट व ऐश्वर्या डिंगर या मॉर्डन कॉलेजमध्ये शिकत असून त्यांच्या क्रीडा शिक्षिका प्रियदर्शनी कोकरे यांना हा देखावा खूप आवडला. समितीला देणगी देत त्यांनी तो देखावा आपल्या घरातील गौरी गणपती सजावटीसाठी नेला.